# शापित अप्सरा

## रघुवीरसिंह राजपूत



BVBK-0402823

हो०वा.
२८२३
९।८।८३

# शापित अप्सरा

बाल वाङ्मय विभाग

रघुवीरसिंह राजपूत

BVBK-0402823

प्रचार प्रकाशन
कोल्हापूर

प्रकाशन क्रमांक / १३१

प्रकाशक
सौ. नंदिनी तु. गवळी
५१३ ब प्लॉट नं. ४/अ
नलवडे कॉलनी
सम्राटनगर, सागरमाळ
कोल्हापूर – ४१६००८
फोन – २०६६८

© रघुवीरसिंह राजपूत
८५, महात्मा गांधीनगर 'साकेत'
स्टेशन रोड
औरंगाबाद ४३१ ००५

प्रमुख वितरक
मे. सिद्धार्थ बुक सेंटर
१३ ई, महालक्ष्मी चेंबर्स
एस. टी. स्टॅण्ड समोर
कोल्हापूर – ४१६ ००१

मुद्रक
हरीश विनायक चौधरी
अंजीश कमर्शियल आर्ट प्रिंटर्स
६६९ ई, शाहूपुरी
कोल्हापूर ४१६ ००१

मुखपृष्ठ
प्रसाद मराठे
२३२ बी, खर्डेकर गल्ली
कोल्हापूर ४१६०१२
फोन : २४३८८

ब्लॉकस्
उदय प्रोसेस

प्रथम आवृत्ती
मे, १९९०

मूल्य रु. ८ फक्त

---

शापित अप्सरा — Shapit Apsara

---

रघुवीरसिंह राजपूत — Rughuveersinh Rajput

---

माझा मुलगा

**चि. उदयसिंह**

व मुलगी

**कु. विजया**

यांनाच ...

**– रघुवीरसिंह राजपूत**

**बालमित्र हो !**

'शापित अप्सरा' ही एक नवीन निर्मिती तुमच्या हातात देत आहे. यात सुख आणि दुःख दोन्ही गोष्टी आहेत. स्पष्टच सांगायचे तर माझ्या लिखाणाचा जो मूळ स्वभावधर्म आहे, त्याचे प्रतिबिंब यावर पडले आहे.

ही नवीन पुस्तिका वाचताना काही काही प्रसंगी तुम्ही हरखून जाल, तर काही प्रसंगी तुम्हाला मनापासून वाईट वाटेल.

मग पुस्तकाचा शेवट तुमच्यासमोर येईल. चंपावती आणि जय शापमुक्त होण्यासाठी चालले असल्याचे समाधान वाटत असतानाच धर्मपूरवासियांच्या हेलावलेल्या भावना तुम्हाला भारावून टाकतील.

**– रघुवीरसिंह राजपूत**

१

एक नगर होते.

त्याचे नाव धर्मपूर! धर्मपूर का तर म्हणे पांडव जेव्हा बारा वर्षे वनवासाला गेले तेव्हा काही काळ इथे राहिले होते. ते प्रत्यक्ष पाहणारे थोडेच आता जिवंत होते! ही दंतकथा वर्षानुवर्षे चालत आली होती.

कुणीच त्याबाबत कधी शंका घेतली नव्हती.

सर्वांनी त्यावर विश्वास ठेवला होता.

लोकांना खरे म्हणजे त्याच्याशी काही घेणेही नव्हते.

असे हे धर्मपूर एका विशाल डोंगराच्या पायथ्याला वसले होते. पूर्वेला उंचच उंच डोंगर. पश्चिमेला स्वच्छ पाणी खळखळ वाहत असलेली नदी. सभोवती सर्वत्र दाट झाडी. त्यात बागडणारे मोर, ससे, हरणे, माकडे, पक्ष्यांचा चिवचिवाट!

मोठे रमणीय वातावरण!

गावात राहत होते एक जोडपे. पतीचे नाव मोहन, पत्नीचे ताराबाई! दोघेही तरुण, सुंदर व देखणे. परस्परांवर नितांत

प्रेम करणारे, एकमेकांसाठी जीव द्यायची तयारी ठेवणारे.

लोकांच्या नजरेत त्यांना एकच दुःख होते, त्यांच्या घरात बाळाचा जन्म झाला नव्हता. त्यांना स्वतःला त्याची चिंता नव्हती, काळजी नव्हती. पण लोकांना दुसऱ्याची उणी-दुणी काढण्यात मोठी मजा वाटते. दुसऱ्याचा कमीपणा दाखविण्यात मोठे अप्रुप वाटते.

मोहन घरी नसला की बायांना वाव मिळे. त्या संधीच्या शोधातच असत. हळूच ताराबाईजवळ येऊन बसत. तिला आपुलकीचा पुळका दाखवीत. नाना प्रकारे बोलत राहत.

‘ बाई ! एखादे झाड कितीही मोठे असले तरी त्याला काय किमत आहे ? फुलाफळांशिवाय त्याचे महत्त्व नगण्यच ! संसाराचेही तसेच असते. मूल-बाळ नसलेले घर कसे उदास वाटते. ’

‘ नुसतेच उदास वाटत नाही, अशुभही वाटते. ’

‘ ती तरी बिचारी काय करणार ? त्यालाही नशीब लागते. एखाद्याचे नशीबच करंटे असते. ’

‘ काहीतरी पुण्यकर्म करावे, दानधर्म करावा. ’

‘ नवऱ्यालाच भजत बसू नये. जरा देवालाही साकडे घालावे. त्याची आराधना केली तर तो का पावणार नाही ? ’

‘ एकेकाचे बाई काळीजच जणू दगडाचे असते. त्यांचे माया-ममता यांच्याशी जणू नातेच नसते. ’

जिच्या जे मनात येईल ते ती बोले.

त्यात सहानुभूतीचा लवलेशही नसे.

थोडीही आपुलकी नसे. साध्या, सरळ स्वभावाच्या ताराबाईला त्यांच्या बोलण्याचा रोख समजे. ती दुःखी होई. नवरा

घरी आल्यावर त्याच्या छातीवर डोके ठेवून ती खूप रडे. मनातले दु:ख आसवांद्वारे व्यक्त करी.

तिच्या मनावरचा ताण हलका होईपर्यंत मोहन काहीच बोलत नसे. तो फक्त तिच्या पाठीवरून आणि डोक्यावरून हात फिरवीत राही. तिला ममतेने गोंजारत राही.

दु:खाचा भर ओसरल्यावर ती केविलवाणे विचारी –

' बायांनी इतके घालून–पाडून का बोलावे ? '

' असतो काहींचा स्वभाव ! ' मोहन शांतपणे म्हणायचा.

' पण आपण तर कुणाच्या अध्यात–मध्यात पडत नाही. '

' तेच लोकांना सहन होत नाही. त्यांना नेहमी कुटाळक्या हव्या असतात. त्या बाया आज तुझी कुचेष्टा करीत आहेत. उद्या तू त्यांच्यात सामील हो. परवा टिंगलटवाळी करण्यासाठी त्या आणखी एखाद्या बाईचा शोध घेतील. '

' आपल्याला का कधीच मूलबाळ होणार नाही ? '

' इतके निराश होऊ नये, तारा ! माणसाने नेहमी आशावादी असावे. परमेश्वरावर विश्वास ठेवावा. सर्वांची दु:खे दूर करण्याचे सामर्थ्य फक्त त्याच्यात आहे. ' मोहन तिची समजूत काढायचा.

' त्या दयाघनाने आपल्याला मूलबाळ द्यावे हो. एकदा सर्वांच्या नाकावर टिचवण्यासाठी तरी ! आपल्या घरात जन्माला आलेले अपत्य सर्वांनी एकदा पाहिल्यावर दुसऱ्या दिवशी मृत झाले तरी मी वाईट वाटून घेणार नाही. कमीत कमी आपले वांझपण तर मिटेल ... ' ताराबाई दु:खाने म्हणायची.

' असे अशुभ बोलू नये, तारा ! माणसाच्या तोंडून अविचाराने आकस्मिक बाहेर पडलेला शब्द कधीकधी त्याच्या

पुढील आयुष्यावर परिणाम करणारा ठरतो. त्याला पश्चात्तापाच्या आगीत जाळीत राहतो.'

'मी मनापासून बोलतेय हो ! पुढे काय होईल ते आज मला समजत नाही. मला तीव्रतेने एकच जाणवते, मी निःसंतान आहे. हा कलंक मिटला पहिजे. काय सांगावे, माझ्यातील या कमतरतेमुळे तूम्हीही पुढे–मागे माझ्यावर नाराज व्हाल. माझी हेटाळणी कराल ... '

'नाही तारा ... कधीच नाही ! तू आणि मी का दोन आहोत ? वाटलेले आहोत ? मुळीच नाही. आपली शरीरे दोन असली तरी आपली मने एक आहेत. आपल्या भावना एक आहेत. आपला आत्मा एक आहे. आपले दुःखही कुणा एकटयाचे नाही. ते आपल्यात विभागलेलेही नाही. तू म्हणतेस, मूल होऊन मेले तरी चालेल. तू हे खरे बोलतेस ? मनापासून सांगतेस ? '

'मी काय करू ? मला काहीच सुचत नाही ! '

'म्हणूनच तू हे बोलण्याचा वेडेपणा करतेस. तू एक गोष्ट विसरतेस – मूलबाळ नाही एवढे एकच दुःख आज आपल्याला आहे. तू सांगतेस तसे झाले तर ... '

'तर काय होईल ?' ताराबाई विचारायची.

'त्या नवीन दुःखाची आपल्या मूळ दुःखात भर पडेल. हे दुःख आपण जिरवू शकतो, पचवू शकतो, कारण हे अज्ञात आहे. ते दुःख असे असणार नाही. आठवणींच्या रूपाने ते सदैव आपल्याला जाळत राहील. आपल्या अंतःकरणाला टोचत राहील. काटयाप्रमाणे मनात सलत राहील.

'तुम्ही पुरुष आहात. मातृत्वाच्या यातना तुम्हाला कशा समजाव्यात ?'

‘ पितृत्वाच्या तर कळत असतील… ’

मोहन मनापासून पत्नीची समजूत काढण्याचा प्रयत्न करायचा. खरे म्हणजे तिची समजूत काढता काढता तो स्वतःच आतल्या आत अस्वस्थ व्हायचा.

## २

स्वर्गातली एक पुष्पवाटिका !

रंगीबेरंगी फुले दिमाखाने डोलत होती, त्यांचा सुवास सर्वत्र दरवळत होता. फुलपाखरे आणि रसिक भृंगे फुलांवर फिरत होते. एकंदर वातावरणच मनाला आल्हाद देणारे होते, पुलकित करणारे होते. त्या ठिकाणी कुणीही आला असता तरी तेथील परिस्थितीने त्याचे मन मोहून घेतले असते.

त्या पुष्पवाटिकेत जय नावाचा गंधर्व आणि चंपावती नावाची अप्सरा एकमेकांना खेटून बसले होते. त्यांच्या दोघांच्या चेहऱ्यावर चिंतेचे जाळे पसरले होते. फुलांच्या पाकळ्या तोडून ते त्या पुष्करणीच्या पाण्यात फेकीत होते. परस्परांशी बोलण्याचे ते टाळीत आहेत की काय, असे वाटत होते.

गंधर्व जयने शेवटी मौन भंग केले,

‘ चंपावती ! ’

‘ हूँ ऽऽऽ! ’

‘ कसला एवढा विचार करतेस ? ’

‘ दुसरा कसला विचार करणार ? आपलाच ... ! ’

‘ याचा शेवट काय होईल ? ’ जयने विचारले.

‘ चांगला तर निश्चितच होणार नाही. ’

‘ तरीही तू माझ्यावर इतके प्रेम का करतेस ?’

‘ प्रेम करणारी मी कोण ? ती चूक माझ्या कमकुवत मनाची आहे. तेच पक्ष्यासारखे भिरभिर उडू लागल्यावर मी त्याला आळा कधी घालू ?’

‘ अप्सरांवर असणाऱ्या बंधनांचे काय व्हावे ?’

‘ त्याचा विचार करण्याची वेळ आता निघून गेली आहे, जय ! जीवनभर त्या बंधनात गुरफटून राहण्याची माझी इच्छा नाही.

‘ अप्सरा असले म्हणून काय झाले ? मीही एक स्त्री आहे. मलाही मन आहे, भावना आहेत. तीच ती नीतिमूल्ये उराशी कवटाळून किती युगे उलटताना पाहायची ?

‘ आमच्यापेक्षा तर भूलोक चांगला. स्त्री–पुरुषांना तिथे आपापल्या अधिकारांचा वापर करता येतो. आपल्या भावना व्यक्त करता येतात. एखाद्या तरी मायेच्या माणसाजवळ मन मोकळे करता येते ... ’ चंपावती खिन्नपणे म्हणाली.

‘ हा एक स्वाभाविक स्वभावधर्म आहे. तुला वाटते, भूलोक चांगला आहे. भूलोकातील माणसांना वाटते, स्वर्गलोकासारखे सुख नाही. प्रत्येकाला दुसऱ्याच्या चांगल्या बाजूचा हेवा वाटतो. त्याखेरीज दुसरीही बाजू असते हे विचारात घ्यायला कुणीच तयार नसतो. ’

‘ जय ! आपल्याला बाकीच्या गोष्टींशी काहीएक घेणे नाही; पण एक गोष्ट तर तुम्हीही कबूल करालच. तिथे आपल्या

इथल्यासारखी प्रेमाची मुस्कटदाबी तर होत नाही ?'

'सर्वच प्रकरणांत होत नसली तरी काही प्रकरणांत होते चंपा ! प्रत्येक गोष्टीला अपवाद हा असतोच.'

'माझ्या डोक्यात सध्या फक्त एकच विचार घोळतो आहे जय ! आणि तो आहे आपल्या प्रेमाचा !'

'मला सर्वांत जास्त भीती तुमची प्रमुख असलेल्या राणी महिष्मतीचीच वाटते, चंपा ! ती फार करड्या शिस्तीची आहे. तसेच राग येण्याच्या बाबतीतही उथळ स्वभावाची आहे. ती केव्हा काय करून बसेल याचा भरवसा नाही.'

'जय !' चंपावती अडखळली.

'बोलताना अडखळलीस ?'

चंपावतीने उत्तरादाखल काहीच म्हटले नाही.

ती एकाग्रतेने त्याच्या डोळ्यांत पाहत राहिली.

'डोळ्यांत काय पाहतेस ?' जयने विचारले.

'माझे स्थान ! माझी जागा...'

'ती डोळ्यांत कशी सापडेल ?'

'मग ?'

'डोळे लबाड असतात, आरशासारखे ! समोर येईल त्याचीच खूशमस्करी ते करतात.' जय म्हणाला.

'डोळ्यांप्रमाणेच माणूसही धोकेबाज असतो ना ?'

'होय चंपा !'

'मग खरे काय असते ?' चंपावतीने विचारले.

'फक्त माणसाचे सात्त्विक मन ! त्याचे अंतःकरण ! आणि तो जिच्यावर खरे प्रेम करतो त्या त्याच्या प्रियतमेचे स्थान त्याच्या अंतःकरणात असते.' जय म्हणाला.

‘ पण ते तर सहजासहजी दिसत नाही. ’

‘ सत्य उमगण्यासाठी मनाची खिडकी उघडी ठेवावी लागते, चंपा ! त्याच्या जास्त निकट जावे लागते. हृदयाची धडधड बाहेर कधीच ऐकू येत नाही. ती ऐकायची असेल तर छातीवर कान ठेवावा लागतो. ’ जय, म्हणाला.

‘ भीती मलाही वाटते जय ! ’

‘ कसली ? ’ जयने विचारले.

‘ ती एकाच प्रकारची नाही, माझ्या बाबतीतही नाही. परिणामाची तमा न बाळगता मी तुमच्यावर मोहित झाले. त्यामुळे कोणतीच शक्ती मला तुमच्यापासून दूर करू शकणार नाही. प्रसंगी तुमच्यासाठी विद्रोह करावा लागला तरी मी तो करीन. पण ... ’

‘ आता आणखी हा पण कसला ? ’

‘ राणीने संतापाच्या भरात मला एखादा शाप दिला तर ... ’

‘ तर काय होईल ? ’

‘ माझी आणि तुमची कायमची ताटातूट होईल. ’

‘ नाही चंपा ! आता ताटातुटीचे नाव काढू नकोस. तुझा क्षणाचाही वियोग सहन करण्याची माझ्या मनाची तयारी नाही.’ जय म्हणाला.

‘ मला का तुमचा वियोग हवा आहे ? पण अप्सरांच्या बाबतीत आतापर्यंत काय होत आले हे तुम्हीही जाणता. मी त्याला अपवाद कशी राहीन ? ’ चंपावती म्हणाली.

‘ आपण त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करू. ’ जय म्हणाला.

'प्रयत्न तर करावाच लागेल. शेवटी किती दिवस आपण अशा तऱ्हेने लपूनछपून परस्परांना भेटत राहणार! कधी ना कधी आपले प्रेम उघड होणारच.' चंपावती म्हणाली.

त्या दोघांना तिथे एकांतात येऊन बसून बराच वेळ झाला होता. नित्याप्रमाणे चंपावतीला इंद्रसभेत नृत्यालाही जावे लागणार होते. त्याची तयारी करायची होती. जास्त उशीर झाला तर तिच्या सखी–मैत्रिणी तिचा शोध घेत तिकडे पोहोचण्याची शक्यता होती.

कोणताही घोटाळा होण्याआधी तिथून परतणे भाग होते.

मोठ्या कष्टाने दोघांनी एकमेकांचा निरोप घेतला. ते आपापल्या प्रासादांकडे परतले. मनात अतृप्त भेटीची ओढ घेऊनच ...

## ३

इंद्रसभा खचाखच भरली होती.

बहुतेक सर्व देव, यक्ष, गंधर्व आदी हजर होते. आज वार्षिक उत्सव होता; त्यामुळे अप्सरांच्या नृत्य चढाओढीही आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यासाठीही आज जरा जास्तच गर्दी जमली होती.

जयसुद्धा उपस्थित होता.

चंपा नृत्यात पारंगत होती. आज ती स्पर्धा जिंकणार असे

तिच्या मैत्रिणींना वाटत होते. अप्सरांची प्रमुख होती महिष्मती ! सर्व तिला राणीच म्हणत. तिलासुद्धा चंपावतीच्या यशाबद्दल खात्री होती.

ठरलेल्या वेळी नृत्याचा कार्यक्रम सुरू झाला.

चंपावती अतिशय तल्लीन होऊन नृत्य करीत होती. रात्रीच्या शांत वातावरणात तिची नृत्यातील चपलता सर्वांना मुग्ध करीत होती. सर्वजण तिची वाहवा करीत होते. तिचे कौतुक करीत होते.

अचानक महिष्मती ओरडली,

' चंपा ऽ ऽ ऽ ! '

सर्वांना महिष्मतीचे ओरडणे ऐकू आले. चंपावती मात्र आपल्याच नादात होती. तिने तिच्या राणीचा आवाज ऐकला नाही. तिचे नृत्य सुरूच होते. तेव्हा महिष्मती पुन्हा उद्‌गारली,

' चंपावती ऽ ऽ ऽ ! '

नृत्य थांबले.

चंपावतीजवळ जाऊन महिष्मतीने विचारले,

' तुझे लक्ष कुठे आहे ? '

चंपावतीने उत्तर न देता मान खाली घातली.

' सर्वजण तुझ्या सुंदर गुलाबी तोंडाकडे पाहत होते. माझे मात्र तुझ्या पदन्यासावर आणि पैंजणांच्या आवाजावर लक्ष होते. तुझे विचार विचलित झाले होते ना ? मन भटकले होते ना ? ' महिष्मतीने जोर देऊन विचारले.

' होय ! ' काहीसे सावरून चंपावतीने उत्तर दिले.

' कुणामुळे ? गंधर्व जयमुळे ? ' राणीने विचारले.

चंपावतीने सरळ मानेने होकार दिला.

‘ तू अप्सरांच्या मर्यादेचा भंग केला आहेस. याबद्दल तुला शिक्षा मिळू शकते, याची तुला कल्पना होती ना ? ’

‘ मी लाचार आहे. माझा नाइलाज आहे. ’

चंपावती म्हणाली.

तिला माहीत होते, खोटे बोलून किंवा गोड बोलूनही आता फायदा नव्हता. क्षमा मागूनही क्षमा मिळणार नव्हती. परिणाम ठरलेला होता. मग लोटांगण घालीत बसण्याचे कारणच काय ?

सभेत एकदम शांतता पसरली होती. शापाच्या भीतीने इतर सर्वांचे चेहरे कासावीस झाले होते. वास्तविक महिष्मती-कडून मिळणाऱ्या शापाचा आणि त्यांचा काहीएक संबंध नव्हता.

नेहमी असेच होते –

ज्याच्या बाबतीत एखादी सुखदु:खाची घटना घडणार असते, त्याच्यापेक्षा त्या घटनेची प्रतिक्रिया इतरांवरच जास्त जाणवते.

जय आणि चंपावती स्थिर होते. त्यांनी मनातल्या मनात कसला तरी पक्का निश्चय केला होता.

इंद्र गालातल्या गालात मंदस्मित करीत होता.

त्याचे कारण त्यालाच माहीत होते.

‘ चंपा ऽऽ! गंधर्व जय ऽऽ! स्वर्गाच्या नीतिनियमांची कुचेष्टा करून तुम्ही दोघांनी घोर अपराध केला आहे. इथल्या चीर-अक्षय सुखांपेक्षा तुम्हाला मर्त्य लोकच्या कृत्रिम, ऐहिक, नश्वर सुखांचा जास्त मोह वाटला, आकर्षण वाटले; त्यामुळे तुमचा स्वर्गात राहण्याचा अधिकार संपला आहे.

‘ मी तुम्हा दोघांना शाप देत आहे. यापुढे तुम्हाला भू-लोकांत जाऊनच वास्तव्य करावे लागेल आणि तुमची

दोघांची ताटातूट होईल ...'

क्षणभरच जय विचारात पडला.

दुसऱ्याच क्षणी आसनावरून उठून तो महिष्मतीकडे झेपावला. तिच्यापुढे हात जोडून उभा राहिला. विनवणीच्या आवाजात तो म्हणाला,

'देवी ! आम्हाला समजत नसले तरी आमचे दोघांचे नक्की चुकले असेल. पण आम्ही तुमचीच लेकरे आहोत. आम्हाला क्षमा करा असेही मी म्हणणार नाही. तरीही एवढी कठोर शिक्षा आम्हाला देऊ नका. आमची ताटातूट करू नका अशी प्रार्थना मी करतो ... '

'जय ! तुझी प्रार्थना ऐकून मला तुमची कीव येत असली तरी माझा नाइलाज आहे. माझ्या तोंडातून बाहेर पडलेला शाप मला परत घेता येणार नाही. '

'दया करा, राणी !' चंपावती म्हणाली.

महिष्मतीच्या मनात चलबिचल सुरू झाली.

देवराज इंद्राने त्या परिस्थितीचा फायदा उचलला. मंदस्मित करीत तो म्हणाला,

'शरणागताला क्षमा करण्यात मोठेपणा असतो, राणी !'

'मला शाप परत घेता येणार नाही, प्रभू ! शिवाय ... शिवाय अपराध्याला दंड तर मिळालाच पाहिजे ना !'

'भावनाधीन माणसाच्या हातून अपराध घडतो, राणी ! आमच्या हातूनही घडला होता. त्याबद्दल गौतम ऋषींनी आम्हाला शापही दिला होता. नंतर मन मोठे करून त्यांनी आम्हाला उःशाप दिला.' इंद्र म्हणाला.

'आपली काय आज्ञा आहे भगवन ?'

‘ तुझी हरकत नसल्यास तूही त्यांना उःशाप दे, महिष्मती.’ इंद्र म्हणाला.

‘ जशी आज्ञा !’

एवढे बोलून महिष्मती गंधर्व जय आणि चंपावतीकडे वळली. ती त्या दोघांना म्हणाली,

‘ स्वतः देवराज तुमच्यासाठी मध्यस्थी करीत आहेत. तरीही तुम्हाला मर्त्य लोकांत तर जावेच लागेल. पण मी आता तुम्हाला उःशाप देत आहे. त्यानुसार तुमची ही अवस्था फक्त वीस वर्षे राहील.

‘ तुम्हा दोघांची पहिली सात वर्षे ताटातूट झालेली असेल. त्यानंतर तुम्ही परस्परांच्या सान्निध्यात याल; पण तुमची रूपे वेगवेगळी असतील. त्यामुळे तुम्हाला एकमेकांची ओळख पटूनही उपयोग होणार नाही. या काळात तुमच्याकडून काही चमत्कार घडतील. लोकांत तुमच्याबद्दल कुतूहल निर्माण होईल. वीस वर्षांनंतर तुम्हो परत स्वर्गात याल ... ’

चंपावती आणि गंधर्व जयचे शरीर हळूहळू विरळ होऊ लागले. पारदर्शी झाले. मग वायुरूप झाले. शेवटी नाहीसे झाले.

इंद्रसभेवर या आकस्मिक घटनेचा परिणाम झाल्यावाचून राहिला नाही. एकेक देव उठून आपापल्या प्रासादाकडे परतू लागला.

2823
बा-वा.

## ४

धर्मपूर !

आकाशात चंद्र दिमाखाने माथ्यावर आलेला. सर्वत्र रुपेरी प्रकाश पसरलेला. जग जणू त्यात न्हाऊन निघत होते. धर्मपूर त्या प्रकाशात शांत झोपलेले !

अचानक ताराबाईने मोहनला आवाज दिला,

' अहो ऽऽ ! उठा जरा. '

' काय झाले ? ' डोळे चोळीत मोहनने विचारले.

' आता मी एक स्वप्न पाहिले. ' ताराबाई म्हणाली.

' स्वप्नात एखादे मूल पाहिले असणार... '

' चेष्टा नाही हो ! मी खरेच सांगत आहे. '

' ठीक आहे. मलाही ऐकू दे... ' मोहन म्हणाला.

' माझ्या स्वप्नात एक स्त्री आली. तिच्या अंगावर पांढरे शुभ्र कपडे होते. ती अतिशय सुंदर आणि तेजस्वी होती. एखाद्या अप्सरेसारखी ! मी तिच्या पाया पडले... '

' लगेच ' तुला मुलगा होईल ' असा आशीर्वाद तिने तुला दिला असेल. ' मोहन हसतच म्हणाला.

' तिने खरेच मला आशीर्वाद दिला हो; पण तुम्ही म्हणता तसा नाही. जरा वेगळा... '

' वाः ! कसा ? ' मोहनने विचारले.

' ती म्हणाली, ' मूलबाळ नाही म्हणून तू दुःखी असतेस, निराश राहतेस. तुझे दुःख आणि निराशा मला संपवायची आहे. मी तुझ्यापोटी एका मुलीला जन्माला घालणार आहे. मात्र ती

एक असामान्य मुलगी राहील, तुला तिचा फार सांभाळ करावा लागेल. केवळ तुझे वांझपण घालविण्यासाठी मी हे करणार आहे.' एवढे बोलून ती अंतर्धान पावली.' ताराबाई म्हणाली.

एवढे सर्व ऐकल्यावर मोहन गंभीर झाला.

'तुम्ही काहीच बोलला नाही.' ताराबाई म्हणाली.

'दैवाचा खेळ मोठा गहन असतो, तारा! तुझे स्वप्न कदाचित खरे होईल; पण त्या तेजस्वी स्त्रीच्या बोलण्यातील काही गोष्टी सूचक वाटतात ...'

'कोणत्या?' ताराबाईने विचारले.

'जाऊ दे! आजच त्यांचा विचार का करावा? झोप आता!' मोहन म्हणाला.

'मला बाकी काही ऐकण्याची इच्छाही नाही. काहीही होवो – माझे स्वप्न खरे झाले म्हणजे बस!' ताराबाई म्हणाली.

मोहन झोपला.

ताराबाईला मात्र झोप येत नव्हती. ती स्वप्नाचा विचार करीत होती. जागेपणीच स्वप्नात रमली होती.

सकाळी अंथरुणावरून उठलेली ताराबाई फार प्रसन्न आणि उत्साही वाटली. तिच्या चेहऱ्यावर एक प्रकारचे तेज झळकत होते. आज ती निश्चितच नेहमीपेक्षा वेगळी वाटत होती.

तिच्यातला हा बदल सर्वप्रथम मोहनला जाणवला. त्याला तिने रात्री पाहिलेल्या स्वप्नाची आठवण आली. स्वप्न खरे होणार अशी त्याला मनोमन खात्री पटली.

त्यानंतर गावातील सर्वांनाच ताराबाईतील फरक दिसला. तो अचानक झालेला होता. सर्वांवर त्याचा परिणाम झाला. बायका तिच्याशी जरा टरकून वागू लागल्या.

स्वप्न खरे झाले होते.

ताराबाईच्या उदरात गर्भ वाढत होता.

श्रावण महिन्याच्या पौर्णिमेला मोहनच्या घरी एका मुलीचा जन्म झाला. जन्मतःच ती एखाद्या नक्षत्राप्रमाणे तेजस्वी दिसत होती. गावातील स्त्रियांचे तर तिला पाहताच डोळे दिपत. त्यांची तोंडे आपोआप बंद झाली.

मोहन आणि ताराबाईने तिचे नाव ठेवले उल्का !

उल्का दिवस, रात्र, महिने आणि सालागणिक वाढू लागली, त्याबरोबर तिचे तेज जास्त जास्तच द्विगुणित होऊ लागले. ती समवयीन मुलींत क्वचितच मिसळायची. सतत गंभीर राहायची. तिच्या वयाला न साजणाऱ्या विचारात मग्न व्हायची.

पांढऱ्या कपड्यांखेरीज तिला दुसरे कपडे आवडत नसत.

एकदा गावात तिच्या वयाची एक मुलगी आजारी पडली. हकिमांच्या औषधांनीही तिचा ताप उतरेना. त्या मुलीच्या आईला काय वाटले कुणास ठाऊक. तिने उल्कासह ताराबाईला तिच्या घरी येण्याची विनंती केली.

ताराबाई उल्काला घेऊन त्या बाईकडे गेली. त्या बाईची मुलगी उल्काच्याच वयाची म्हणजे सहा वर्षांची होती. तिचे नाव होते रागिणी ! ती डोळे मिटून अंथरुणावर शांत पडून होती.

ताराबाईने आणि उल्काने खोलीत पाय ठेवताच रागिणीने कण्हायला सुरुवात केली. तिच्या आईवडिलांना आणि सहानुभूतीमुळे जमा झालेल्या गावातील स्त्रियांना मोठे नवल वाटले. कारण आठ दिवसांपासून रागिणीचा आवाज बंद होता. हालचाल थांबली होती.

रागिणीच्या पायांकडे उभी राहून उल्का एकटक तिच्या

चेहऱ्याकडे पाहू लागली. त्या वेळेस तिच्या स्वतःच्या चेहऱ्याचा रंग बदलू लागला. डोळे तेजाने चमकू लागले.

तिच्या तोंडातून एकदम शब्द बाहेर पडले,

'रागिणी ! किती दिवस अंथरुणावर पडून राहतेस ?'

डोळे मिटलेल्या अवस्थेतच रागिणीने दोन्ही हात जोडले.

'आता उठ रागिणी ! तुझ्या सर्व मैत्रिणी खेळण्यासाठी तुझी वाट पाहत आहेत.'

'देवी ऽऽऽ ! '

असे उद्गारून रागिणीने डोळ्यांची हालचाल केली.

'तुझ्या आई-वडिलाना किती त्रास झाला आहे ! तुझी भावंडे किती दुःखी आहेत ! आठ दिवसांपासून तू काहीच खाल्लेले नाहीस, ऊठ ! आधी काहीतरी खा आणि मैत्रिणींबरोबर खेळायला बाहेर जा.'

सर्व बाया एकमेकींच्या तोंडाकडे आणि उल्काच्या चेहऱ्याकडे पाहू लागल्या. कारण ती बोलत असता तिचा जो आवाज येत होता तो तिचा नव्हता. वेगळा होता. तो एखाद्या तरुणीसारखा होता. अत्यंत हुकमी आणि रुबाबदार होता.

रागिणीने हळूहळू डोळे उघडले. कुणाचीच मदत न घेता ती अंथरुणावर उठून बसली. उल्का उभी होती तिकडे पाहू लागली. पण तिची दृष्टी बरीच वर होती. ती जणू अठरा-वीस वर्षे वयाच्या एखाद्या उंच तरुणीकडे पाहत होती.

'आता उठतेस ना ?' मधुर हसत उल्काने विचारले.

'होय देवी !'

रागिणी खाली उतरली. सरळ उल्काच्या पायांवर झुकली. वर पाहत ती म्हणाली,

‘ मला सोडून जाऊ नकोस, देवी ! माझ्याजवळच रहा. ’

‘ रागिणी ... ’

असे बोलून उल्का खाली बसली. आत्ताचा आवाज मात्र मूळ लहानग्या उल्काचाच होता. तिने रागिणीचे हात हातात घेतले. त्याबरोबर गोंधळल्यासारखी रागिणी म्हणाली,

‘ उल्का ! तू ? मग आता इथे उभी होती ती ... ती देवी कुठे गेली ?’

उल्काने उत्तर दिले नाही.

रागिणी एकदम चांगली झाली, जसे ती कधीच आजारी पडली नव्हती. ती हिंडूफिरू लागली. मैत्रिणींत खेळू लागली.

संपूर्ण धर्मपूरमध्ये ती बातमी पसरली.

## ५

रात्री घरी परतलेल्या मोहनला ताराबाईने सर्व हकीकत सांगितली. ती ऐकल्यावर त्याने एवढेच विचारले,

‘ तू हे सर्व खरे सांगतेस ?’

‘ मीच काय, उद्या सर्व गावाला तुम्ही हे सांगताना ऐकाल. तिथे का मी एकटी होते ? गावातील इतर बायाही होत्या. सर्वांनी हा प्रकार आपापल्या कानांनी ऐकला. डोळ्यांनी पाहिला. काहींच्या चेहऱ्यावर आश्चर्य होते, तर काहींचे चेहरे मनात धास्तावल्यामुळे घामाने लथपथ होत होते ...’ ताराबाई म्हणाली.

'हूँ ... ऊँ ...' मोहन उद्गारला.

रात्री शांत झोपलेल्या मोहनला ताराबाईने हळूच हलवून जागे केले. त्याच्या तोंडून शब्द बाहेर पडू नये म्हणून त्याच्या तोंडावर हात ठेवला. तिने बोटाने उल्का झोपली होती तिकडे इशारा केला.

मोहन झटक्यात उठून बसला.

तो उल्काच्या चेहऱ्याकडे पाहू लागला.

तिच्या चेहऱ्यासभोवती सौम्य प्रकाशाचे एक तेजोवलय गरगर फिरत होते. हळूहळू तिच्या चेहऱ्यावर गंभीर भाव पसरले आणि ती पुटपुटू लागली.

'आम्हाला माफ करा, राणी ! आमचे चुकले असेल; पण आम्हाला इतकी कठोर सजा देऊ नका ...'

तिचे ते झोपेतले बरळणे ऐकून ताराबाईच्या दोन्ही डोळ्यांतून घळघळ आसवे वाहू लागली. तिने मोहनच्या छातीवर डोके टेकले. उल्काची झोप चाळवू नये म्हणून ते तोंडातून एक शब्दही बाहेर काढीत नव्हते.

हळूहळू उल्काच्या चेहऱ्यासभोतालचे तेजोवलय नाहीसे झाले. त्याबरोबर तिच्याकडे झेपावून ताराबाईने तिला घट्ट हृदयाशी कवटाळले. तिच्या कपाळाचा मुका घेतला.

मोहनलाही धीर धरवला नाही.

स्वतःच्या अंथरुणावरून उठून तो उल्का झोपली होती तिथे गेला. तिच्या चेहऱ्याकडे पाहत राहिला. उजवा हात तिच्या डोक्यावरून हळूहळू फिरवू लागला. तसे करीत असताना त्याच्या डोळ्यांतून का आणि कधी आसवे वाहू लागली ते त्याच्या लक्षातच आले नाही.

‘ का हो ! मघाशी हिचा आवाज किती वेगळा वाटला. आताशी हिच्या वयाची सात वर्षे पूर्ण झाली आहेत. ती आठव्या वर्षात पदार्पण करीत आहे; पण कधीकधी तिचा आवाज एखाद्या तरुणीसारखा वाटतो. ’ ताराबाई म्हणाली.

‘ तुझे स्वप्न आठव ! ’ मोहन म्हणाला.

‘ मला ते आजही जसेच्या तसे आठवते. ’

‘ तुझ्या स्वप्नात आलेल्या स्त्रीने हिच्याबाबतीत तुला सांगितले होते, ‘ मात्र ती एक असामान्य मुलगी राहील. ’ लक्षात आहे ना ? ’

‘ होय ! आहे माझ्या लक्षात. मग ही कोण असावी ? ’

‘ हिची लक्षणे पाहिल्यावर मला तर असे वाटते की ही एखादी शापित अप्सरा असावी. ’

‘ तसे असेल तर आपल्याकडून तिचा नीट सांभाळ होऊ शकेल का ? ’ ताराबाईने केविलवाणे विचारले.

‘ त्या स्वप्नातल्या स्त्रीने त्याबाबतही तुला स्पष्ट कल्पना दिलेली आहे. ती तुला सरळ म्हणाली होती, तुला तिचा फार सांभाळ करावा लागेल. केवळ तुझे वांझपण घालविण्यासाठी मी हे करणार आहे. ’

‘ म्हणजे हो काय ? ’

‘ म्हणजे हेच की ती आपल्याजवळ आहे तोवर तिला सांभाळ. तिच्याकडून कोणतीच चूक होणार नाही. समजा, झाली तरी तिला दुखवू नकोस. ’ मोहन म्हणाला.

दुसऱ्या दिवशी सकाळी उल्का घराबाहेरच्या ओटयावर बसली होती. ती आपल्याच विचारात मग्न होती. अंगणातील पिंपळाच्या झाडावरून अनेक पक्ष्यांच्या चिवचिवाट ऐकू येत होता.

त्याच्याकडेही तिचे लक्ष नव्हते.

पोपटांचा एक मोठा थवा उडत आला. तो त्या पिंपळाच्या झाडावर बसला. इतर पक्ष्यांच्या किलबिलाटात पोपटांच्या टचा ऽ टचा ऽ ऽ ची भर पडली.

आणि एकदम उल्का दचकली.

त्या पोपटातील एक पोपट टचा ऽ टचा ऽ करीत नव्हता. तो करुण आवाजात ओरडत होता.

' चंपा ऽ ऽ ! चंपावती ! ! चंपा ऽ ऽ ! '

त्या आवाजाने तिची समाधी भंगली होती. ती उठून उभी राहिली. झाडाच्या शेंड्याकडे पाहू लागली. सर्वांना टाळून तो पोपट एकटा एका बाजूस बसला होता. आकाशाकडे पाहत अत्यंत दीनपणे तो ओरडत होता,

' चंपा ऽ ऽ ! चंपावती ! चंपा ऽ ऽ ! '

' जय ऽ ऽ ऽ ! '

अचानक उल्का मोठ्याने ओरडली.

तिचा आवाज ऐकून मोहन आणि ताराबाई धावतच घरातून बाहेर आले. तोपर्यंत पिंपळाच्या झाडावर बसलेला तो पोपट खाली येऊन उल्काच्या हातावर बसला होता. तिने त्याला दोन्ही हातांनी कुरवाळायला सुरुवात केली होती. तोही खूपच आनंदी दिसत होता.

आणि उल्का ?

समजू लागल्यापासून आज पहिल्यांदा ती इतकी प्रसन्न होती.

मोहन आणि ताराबाईला नवल वाटले.

त्यांना समोर पाहताच उल्काने पोपटाला गुप्तपणे इशारा

केला. त्याबरोबर त्याचे बागडणे जरा कमी झाले. एखाद्या पोक्त माणसाप्रमाणे तो गंभीर दिसू लागला.

उल्का मोहन आणि ताराबाईला म्हणाली,

' बाबा ! आई ! हा पोपट छान आहे नाही ! आपण त्याला आपल्याजवळच ठेवून घेऊ या का ?'

' जरूर...जरूर ठेवून घेऊ. तुला तो आवडला ना ? मग प्रश्न मिटला. आम्ही का नकार देणार आहोत ? तुझ्या इच्छे-विरुद्ध वागणार आहोत ? ' मोहन म्हणाला.

' याच्यासाठी चांगला पिंजरा बनवून घ्या. ' ताराबाई म्हणाली.

' नाही आई ! गगनात मुक्त भराऱ्या मारणारा पक्षी ! त्याला का बंदी बनवायचे ? त्याला मोकळाच ठेवू. तो कुठेच पळून जाणार नाही. बाहेर गेला तरी परत येईल. त्याच्यासाठी पिंजऱ्याची काहीच गरज नाही. ' उल्का घाईघाईने म्हणाली.

' मी त्याच्या सुरक्षिततेसाठी बोलले. ' ताराबाई म्हणाली.

' तू पाहते आहेस आई, तो बलवान आहे. स्वतःचे संरक्षण करण्यास समर्थ आहे. ' उल्का म्हणाली.

' जशी तुझी इच्छा ! ' ताराबाई म्हणाली.

पिंपळाच्या झाडाच्या शेंड्यावर बसलेला पोपटांचा थवा काही वेळाने उडून गेला. उल्काचा पोपट मात्र तिथेच राहिला. उल्का म्हणाली,

' आपण याचे नाव जय ठेवू. '

' छान राहील. ' मोहन म्हणाला.

आणि जय पोपट उल्काजवळ थांबला.

## ६

जयच्या वास्तव्यामुळे मोहनच्या घरचे वातावरण पार बदलून गेले. घरात प्रसन्नता पसरली. सदैव गंभीर राहणाऱ्या उल्काच्या चेहऱ्यावर गुलाब उमलले. ती टवटवीत दिसू लागली.

दिवसभर ती जणू पोपटाला हातावर बसवून सर्वत्र मिरवत राहिली. त्याचे कौतुक करीत राहिली. तिचा पोपट सर्वांच्या कुतूहलाचा विषय झाला. कोणतेच बंधन नसूनही तो उडून जात नव्हता. उल्का त्याला भरवीत राहिली. पाणी वगैरे पाजत राहिली.

रात्री सर्वजण जेवायला बसले. जय शेपटी फडफडवीत रुबाबात फिरत होता. तेवढ्यात एक मांजर आत आले. ते त्याच्यावर झडप घालण्यासाठी किरण साधू लागले. ताराबाईचे मांजराकडे लक्ष गेले. ती त्याला हुसकावण्यासाठी हालचाल करणार तोच उल्काने तिला गप्प राहण्यासाठी खुणावले.

मांजराने झडप घातलीच. मोहनच्या आणि ताराबाईच्या आश्चर्याला सीमा राहिली नाही. जयने त्या मांजरावर उलट हल्ला चढविला होता. मांजराला दोन्ही पायांत पकडून तो किंचित वर उडाला. त्याच्या डोक्यावर चोचीने प्रहार करू लागला. मांजर केविलवाणे ओरडू लागले. स्वतःची सुटका करण्यासाठी धडपडू लागले.

जयने पायांची मिठी सैल केली.

धपकन खाली पडलेले ते मांजर भीतीमुळे दरवाजावर आदळतच धूम पळाले. जय उल्काच्या खांद्यावर येऊन बसला.

तेव्हा हसतच उल्का म्हणाली.

‘ मांजर तर पळाले. आता माझीही तिच्यासारखीच अवस्था करण्याचा विचार दिसतो. ’

त्यावर जय तिच्या गालावर लाडाने चोच घासू लागला.

‘ लाड पुरे ! माझ्या गालाला गुदगुल्या होत आहेत. ’

तिच्या खांद्यावरून खाली उतरून तो खाली फिरत राहिला.

रात्री मोहन आणि ताराबाई झोपली. उल्कानेही झोपल्याचे नाटक केले. जय तिच्या अंथरुणावरच बसून राहिला. मोहनला आणि ताराबाईला गाढ झोप लागली. तशी खात्री पटताच जयला जवळ घेऊन उल्का म्हणाली –

‘ जय ! दिवसभर तुम्हाला तोंड उघडता येणार नाही. आपले रहस्य लोकांना माहीत व्हायला नको. माहीत झाले तर आपल्याला अडचणीचे होईल. ’

‘ उल्का ! ’ एकाएकी ताराबाईने आवाज दिला.

‘ काय आई ? ’

उल्काने आईच्या आवाजाला साद तर दिली; पण ती दचकली. ताराबाई झोपली आहे, अशी तिची कल्पना होती. ती जागीच असल्याचे पाहून उल्काला मनोमनी धक्का बसला.

‘ तू अद्याप झोपली नाहीस की झोपेत काही तरी बरळत होतीस ? ’ ताराबाईने विचारले.

‘ मला झोप येत नव्हती आई ! ती जयची आणि मांजराची झटापट नजरेसमोर फिरत होती. मी त्याला तेच समजावीत होते की, त्याने असे जोखमीचे काही करू नये. ’

‘ तो एक निरागस पक्षी ! त्याला का तुझे बोलणे समज-

णार आहे ?' ताराबाई म्हणाली.

'हो ऽऽ! तेही खरेच आहे !'

जणू आपली फार मोठी चूक झाली आहे असा आव आणीत उल्का म्हणाली.

'डोळे मिटून पडून रहा. कोणताच विचार मनात आणू नकोस, म्हणजे आपोआप झोप लागेल.' ताराबाई म्हणाली.

'ठीक आहे आई ! मी आता शांत पडून राहते.' उल्काने कष्टाने उत्तर दिले.

तिने डोळे मिटले.

तिला खरोखरच शांत झोप लागली.

दुसऱ्या दिवशी सकाळी आणखी एक घटना घडली. जय पिंपळाच्या झाडाखालील ओटचावर आपल्याच नादात स्वच्छंदपणे उडचा मारीत होता. येणारे-जाणारे काही क्षण तिथे थांबत. त्याची गंमत पाहत आणि निघून जात. लहान लहान मुलांचा एक घोळकाही तिथे जमला होता.

गल्लीतील दोन फालतू कुत्र्यांना जयचे कौतुक म्हणजे जणू स्वतःचा अपमान वाटला. ते मोठमोठचाने भुंकत हळूहळू पुढे सरकू लागले. जयने त्यांच्याकडे अजिबात लक्ष दिले नाही. त्याचे आपले उडचा मारणे चालूच !

चिडलेल्या कुत्र्यांनी एकाच वेळेस जयवर झडप घातली. तोपर्यंत त्यांचे भुंकणे ऐकून गावातील त्यांचे इतरही जातभाई जोर काढत जमा होऊ लागले होते.

कुत्र्यांचीच जात ती ! त्यांच्या भीतीने कुणी पळू लागला तर मोठचा जिद्दीने त्याचा पाठलाग करतील. त्याच्या अंगावरचे कपडे ओरबाडून फाडतील. त्याच्या पोटरीचा लचका तोडतील.

या उलट एखाद्याने डोक्यात धोंडा घातला तर मागेही उलटून पाहणार नाहीत. मागच्या दोन्ही पायांत शेपटी दाबून धूम पळत सुटतील. वाटेत एकाएकी एखादा अडथळा आला तर त्याच्यावर आदळतील, कोलांट्या खातील.

मग कसेबसे उठून धूम पळतील !

एकटा पोपट पाहिल्यावर कुत्र्यांच्या वीरवृत्तीने उचल खाल्ली नसती तरच नवल होते.

कसेही करून जयचा फडशा पाडण्याचा त्यांचा विचार !

घडले मात्र वेगळेच ! विचित्र आणि अविश्वसनीय !

झडप घालण्यात पुढाकार घेतलेल्या त्या दोन कुत्र्यांपैकी जयने एकाची मानगूट पायांत पक्की पकडली. दुसऱ्याची चोचीत ! तो थोडासा वर उडाला. झटक्यात खाली आला. दोन्ही कुत्रे जमिनीवर आदळले. तो पुन्हा वर उडाला, खाली आला.

दोनचार वेळा तसे करून त्याने कुत्र्यांना सोडले. आपल्याच भाऊबंदांना लोळवत ते दोघे जीवाच्या आकांताने पळत सुटले. इतरही तयारीतच होते.

त्यांची पळण्याची जणू चढाओढ लागली.

ते पळून गेल्यावर जणू काहीच घडले नाही अशा साळसूदपणे जय त्या ओट्यावर पुन्हा उड्या मारू लागला.

गावातल्या बऱ्याच जणांनी तो प्रकार पाहिला. काहींनी प्रत्यक्ष पाहणाऱ्यांकडून ऐकला. आश्चर्याने सर्वांचे डोळे विस्फारले गेले. छातीत धडकी भरली. गावात उल्का आणि जय यांच्या दिव्यत्वाबद्दल उलटसुलट चर्चा सुरू झाली.

ताराबाईला मूलबाळ नसताना ज्या बाया तिची टिंगलटवाळी करीत होत्या, त्या तिची माफी मागू लागल्या. उल्का

आणि जयबद्दल सर्वांनी धास्ती घेतली.

कुत्र्यांनी आणि मांजरांनी तर मोहनच्या गल्लीत येणेच बंद केले. जय दृष्टीस पडताच ते पळून जाऊ लागले.

2023
बा.वा.

## ७

दररोज नवनवे चमत्कार घडत होते. उल्का आणि जय गावातील सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. मोहनची परिस्थिती खूपच सुधारली होती. ते सुखी झाले होते.

दिवस मागे पडत होते.

एके दिवशी संध्याकाळची घटना –

गावात देवाच्या नावाने एक सांड सोडलेला होता. तो कुणाच्याही उभ्या पिकात घुसायचा. मनसोक्त खायचा. पोट भरले की हुंदडायचा. पिकाची नासधूसही करायचा. पण कुणीच त्याला हाकलायचे नाही.

देवाचा सांड होता ना !

एक–दोघांना विनाकारण होणारे नुकसान सहन झाले नाही. त्यांनी त्याला पिकातून काढण्याचा प्रयत्न केला तर तो त्यांच्याच जीवावर उठला. त्याने त्यांच्यावर हल्ला करण्यासाठी मागेपुढे न पाहता त्यांचाच पाठलाग केला. बिचाऱ्यांनी स्वत:ला कसेबसे त्याच्या तडाख्यातून वाचवले.

दिवसेंदिवस त्या सांडाची मस्ती वाढतच चालली. गावातही

तो गुराढोरांना त्रास देऊ लागला. त्यांना सळो की पळो करू लागला. लहान मुलांचे रस्त्यावर फिरणे त्याने कठीण करून टाकले.

गावातील काही कर्ती माणसे मोहनकडे आली. त्यांनी मोहनला सांगितले,

' देवाचा आहे म्हणून या सांडाचे आपण काहीच करू शकत नाही. त्याचे काही केले तर देवाचा कोप होईल; पण आता त्याच्याकडे दुर्लक्ष करूनही चालणार नाही. तुझी उल्का आणि तिचा पोपटच काहीतरी करू शकतील. '

तारुण्यात पदार्पण केलेल्या उल्काने त्यांचे बोलणे ऐकले. जय तिच्या खांद्यावरच बसलेला होता. मात्र तिरपी नजर करून तो त्यांचे बोलणे जणू एकाग्रतेने ऐकत होता. उल्का त्या लोकांना म्हणाली,

' तुम्ही आता जा. त्याचा बंदोबस्त होऊन जाईल. '

लोकांना खात्री होतीच.

संध्याकाळ झाली. उल्का जयला डाळिंबाचे दाणे भरवीत बसली होती. अचानक लोकांचा आरडाओरडा ऐकू आला. तो आवाज त्यांच्या घराकडेच येत होता. क्षणात निर्णय घेऊन उल्का म्हणाली,

' जय ! आज या सांडाची खोड मोडलीच पाहिजे. '

ती असे बोलत आहे तोच एक माणूस धावत आला. आपली मग्रूर शिंगे उगारून तो मस्तवाल सांड त्याचा पाठलाग करीत होता आणि ' मेला ऽ वाचवा ऽ ऽ धावा ऽ ऽ ऽ ' असे ओरडत लोक त्याच्या मागे धावत होते.

उल्काने ओटयावरून खाली उडी मारली. जयसुद्धा वेगाने

उडाला. उल्का तो माणूस आणि सांड यांच्यामध्ये जाऊन उभी राहिली. जय सांडाच्या माथ्यावर जाऊन बसला. या सर्व घटना इतक्या वेगाने घडल्या की कुणाच्या काही लक्षातच आले नाही.

लक्षात आले तेव्हा लोकांचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसेना. त्या सांडाने उल्कापुढे दोन्ही पुढचे पाय टेकले होते. तो जणू तिला प्रणाम करीत होता.

एकदा तर त्याने डोक्यावरच कोलांटी उडी खाल्ली.

त्यानंतर तो सांड इतका वरमला की पुन्हा कुणाचे नुकसान करण्याची किंवा त्रास देण्याची आगळीक त्याने केली नाही. लहान मुले गंमतीने त्याच्या शेपटीचा गोंडा ओढू लागली. त्याने त्यांच्याकडे रागानेसुद्धा पाहिले नाही.

पाहता पाहता वीस वर्षे संपायला आली.

एके दिवशी दुपारी जेवणे आटोपली. उल्का फारच गंभीर दिसत होती. ताराबाईला कसेतरीच वाटले. तिला जवळ घेऊन, तिच्या डोक्यावरून हात फिरवीत ताराबाईने विचारले,

' उल्का ! तुझी प्रकृती ठीक आहे ना ? '

' होय आई ! ' नाराजीने उल्काने उत्तर दिले.

' मग आज तू इतकी गंभीर का ? '

' बाबा आणि तू आमच्यावर किती प्रेम करता, आई ! '

' आई–बापाची माया तशीच असते, बाळ ! '

' आपण माझे नाव उल्का ठेवले. एक गोष्ट तेव्हा तुम्ही विचारात घेतली नाही ... ' उल्का गप्प झाली.

' कोणती गोष्ट बाळ ? ' आईने ममतेने विचारले.

' उल्का कधी ना कधी आकाशातून निखळून पडते. '

' नाही बाळ, असे भलतेच काही बोलू नकोस. '

'माझा नाइलाज आहे, आई! खरे म्हणजे अखंड तुमच्या मायेच्या सावलीत राहावे, तुमच्या प्रेमाचा लाभ घ्यावा असे आम्हालाही वाटते; पण आमच्या मर्जीवर काहीच अवलंबून नाही. आम्ही कुणाच्या तरी बंधनात गुंतलेले आहोत. ते झुगारण्याची शक्ती आमच्यात नाही.'

उल्का अतिशय दुःखाने बोलत होती.

'तुला कल्पना नाही बाळ! तुझ्या जन्माआधी मी किती झुरणीला लागले होते. तुझ्या बाबाना वाईट वाटू नये म्हणून मी वरून तसे कधीच दिसू दिले मात्र नाही. नंतर तुझा जन्म झाला. आम्ही किती सुखावलो होतो.' ताराबाई म्हणाली.

'आई! या जगात जो येतो त्याला जावेही लागतेच...'

दोघी मायलेकींची चर्चा होत राहिली.

मोहनचा चेहरा मात्र निर्विकार होता.

घरात गांभीर्य पसरले.

रात्र झाली. कुणालाच जेवावेसे वाटले नाही. उल्काला कुशीत घेऊन तारा उगीच अंथरुणावर पडून राहिली. जय एका बाजूला शांत बसून होता. मोहन सताड डोळे उघडे ठेवून उताणा पडला होता. घराच्या छताकडे पाहत होता.

मध्यरात्र झाली. घरात धुसर प्रकाश पसरू लागला. हळूहळू त्यात एकवीस वर्षांपूर्वीची तीच तेजस्वी स्त्री प्रकटली. उल्का एकदम अंथरुणावरून उठली. त्या स्त्रीसमोर हात जोडून उभी राहिली. जयसुद्धा तिच्या पायांजवळ जाऊन बसला.

तिला पाहताच ताराबाईसुद्धा ताडकन अंथरुणावरून उठली. त्या तेजस्वी स्त्रीपुढे हात जोडून बसत ती म्हणाली,

'माते! तू तर सर्वज्ञ आहेस. उल्का आज एकाएकी काय

बोलू लागली ते तुला माहीतच असेल.'

'बाई! नीट आठवून पहा. मूलबाळ होण्याआधी तुझी काय अपेक्षा होती? वांझपण फिटावे हीच ना? ते कधीचेच फिटले. त्यानंतर चांगली वीस वर्षे तू मातृत्व उपभोगलेस. आता मोह आवर. उद्या संध्याकाळी उल्काला परतावे लागेल. जयसुद्धा तिच्याबरोबर राहील. त्यांना प्रेमाने निरोप द्या.' ती स्त्री म्हणाली.

'माते! तू कोण आहेस? उल्का आणि जय कोण आहेत?' ताराबाईने कसेबसे विचारले.

'माझे नाव नियती! ही उल्का म्हणजे शापित अप्सरा चंपावती. हा जय पोपट म्हणजे गंधर्व जय! चंपावतीचा प्रियकर. वीस वर्षांचा कालावधी संपल्याने त्या दोघांना त्वरित स्वर्गात परतायचे आहे. तिथे त्यांचा विवाह व्हावयाचा आहे.'

स्वतःला नियती म्हणवून घेणारी ती स्त्री अदृश्य झाली. ताराबाईने उल्काला कवटाळले. जयला गोंजारले. तिच्या दोन्ही डोळ्यांतून घळघळ आसवे वाहू लागली. मोहन वर स्पष्ट दाखवत नसला तरी आतल्या आत रडत होता.

ती रात्र बिना झोपेचीच संपली.

सकाळी उठल्यावर उल्काने स्नान केले. देवपूजा केली. मोहन–ताराबाईच्या पाया पडली. पाया पडताना खूप रडली. नंतर त्यांना म्हणाली,

'मला निरोप द्यायला येणार ना?'

जय तिच्या खांद्यावर बसला. ती निघाली. तिच्या मागे रडतच तिचे आई–बापही निघाले. हळूहळू गावात खबर पसरली. सारा गाव जमला. प्रत्येकाच्या डोळ्यांतून आसवे वाहू लागली.

उल्का गावाबाहेरच्या बारवाजवळ आली.

त्या बारवाजवळ गावातील लेकी–सुना बहुधा फिरकत नसत. त्याला अप्सरांचा बारव म्हणत. तिथे अप्सरांचे वास्तव्य आहे, त्या तरुण बायांना झपाटतात असा सर्वांचा समज होता.

खाली उतरणाऱ्या पायऱ्यांच्या काठावर उभी राहून उल्काने सर्वांना प्रणाम केला. निश्चयात्मक दृष्टीने तोंड फिरविले. ती एकेक पायरी उतरू लागली. जय तिच्या खांद्यावरच बसला होता.

वरच्या पायऱ्या संपल्या. पाण्यातल्या सुरू झाल्या. उल्का त्या उतरत पाण्यात शिरली आणि नाहीशी झाली. जयने जराही हालचाल केली नाही. तिच्या खांद्यावर बसलेल्या अवस्थेतच तोही पाण्यात शिरला.

मोहन आणि ताराबाईने हंबरडा फोडला.

गावातील सर्वांनाच रडे आवरेनासे झाले.

काही क्षणांनंतर बारवाचे पाणी पूर्ववत शांत झाले होते ...

2023

BVBK-0402823